**शपथेवर सरतपास श्री.कादरी अधिवक्ता अर्जदारा तर्फे—**

१५. शपथपत्र नि.क्र. यु.—**१५** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी नि. यु—१७ सोबत मी अनु.१ वर माझे पतीच्या मृत्यु दाखल्याची पडताळणी केलेली प्रत सादर केलेली आहे तसेच अनु. २ ते ५ वर सर्व अर्जदाराच्या आधार कार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती सादर केलेल्या आहे. अनु. क्रं.१ ते ५ वरील दस्तांना **यु.१८ ते यु.२२** देण्यात आले.

१६. कागदपत्र यादी नि.यु.७ सोबत अनु.६ वर इंशुरन्सची प्रत अनु. क्रं.७ वर वाहन फिटनेस प्रमाणपत्र अनु.क्रं. ८ वर शिवशाही बसचे आर.सि.बसची प्रत. अनु.क्रं.९ वर एफ.आय.आर.ची प्रत अनु.१० वर रिपोर्टची प्रत व अनु.११ वर मरणोत्तर पंचनामाची पडताळणी केलेली प्रत सादर केलेली आहे. अनु.कं. ६ ते ८ वरील दस्तांना नि.यु. **२३ ते २५** नि. देण्यात येते. अनु. ९ ते १० च्या प्रती हया तेलगु भाषेत असल्यामुळे त्यांचे अधिकृत भाषांतरीत प्रत दाखल केल्याशिवाय व अधिकृत भाषांतरीत प्रत शाबित झाल्याशिवाय नि.क्रं. देता येणार नाही.

१७. कागदपत्र यादी नि.यु.७ सोबत अनु.१२ वर फार्म डबल ए ची प्रत. अनु.१३ वर माहिती अधिकाराखाली मागीतलेली लॉक बुकची प्रत अनु.१४ वर बॅंक पासबुकची प्रत अनु. १५ वर महाव्यवस्थापक यांनी विभाग नियंत्रक यांना दिलेल्या पत्राची व महाव्यवस्थापक व रेनबो टुर्स अॅड ट्रॅव्हल्स् यांचे मध्ये झालेल्या कराराची प्रत सादर केलेली आहे. अनु. १२ ते १५ यांना अनु. यु. **२६ ते यु.२९** नि.देण्यात आले. अनु.१८ वरील रेशन कार्डची प्रत मला दाखविली **त्यास नि.यु.३०** देण्यात आले. अनु.१६ व १७ वरील भाषांतरीत केलेले दस्त हे अर्जदाराचे विधिज्ञ यांनी स्वत: हस्तांतरीत केलेले असल्यामुळे त्या दस्तांना नि.क्रं. देता येणार नाही.

१८.  नि.यु.२८ वरील राशनकार्ड मला दाखविले अनु.३ वर माझा मुलगा अरशानचे नाव नमुद आहे तो लहानपणीच वारलेला आहे.

**सरतपास पुर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही.**

**गै.अ.१ ते ३ हे एकतर्फी असल्यामुळे त्यांचे बाबत उलटतपास नाही.**

**गै.अ. २ व ४ चे विधिज्ञ यांचा पुकारा केला  गैरहजर. सबब उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**समक्ष**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
दि.२४.०३.२०२६.  कामगार न्यायालय, चंद्रपुर